# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 17.01.2025 वार- शनिवार

---

**विखेपाटील**

नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यात 112 टीएमसी तर कृष्णा खोऱ्यात सत्तर टीएमसी असं एकंदर 182 टीएमसी पाणी उपलब्ध होईल. त्यामुळे चार लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून त्याचा लाभ मराठवाड्यातील सहा आणि पश्चिम महाराष्ट्रातील ३ जिल्ह्यांना होणार आहे अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज पुण्यात दिली. कोकणातून इतर नदी खोऱ्यात पाणी वळवण्यासाठीच्या नदी जोड प्रकल्पांबाबत यशदा इथ एका कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत विखे पाटील बोलत होते. शेतीसाठीच्या पाण्याची तूट वाढत आहे. शहरांनी आता पाण्याचे संवर्धन आणि शुद्धीकरण करून पाणी वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे 40% पाणी सिंचनाखाली येऊ शकते. असं विखे पाटील यांनी सांगितलं. धरण परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असून ड्रोन द्वारे त्याचे सर्वेक्षण करून अतिक्रमणे काढण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला देण्यात आल्या असल्याचं ते म्हणाले.

**इथेनॉल**

इथेनॉल उत्पादनाला अधिक चालना देण्याच्या दृष्टीनं विचारमंथन करण्यासाठी आज पुण्यात एक बैठक झाली. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. सहकार क्षेत्रात काम करणारे देशभरातील अधिकारी, तज्ज्ञ आणि सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी यात सहभागी झाले होते.
मक्यापासून इथेनॉलचं उत्पादन केल्यास कारखान्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल, असं केंद्रीय सहकारिता मंत्रालयाने सुचवलं होतं. त्यानुसार देशातील ६३ सहकारी साखर कारखान्यांना मक्यापासून इथेनॉल बनवण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. आसवनी प्रकल्पांच्या श्रेणीत सुधार करण्यासाठी त्यांना अर्थसहाय्य मिळावं याकरता राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाने पुढाकार घेतला आणि त्याला केंद्र सरकारकडून चांगला प्रतिसादही मिळाला आहे. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाने या कामासाठी व्याज सवलतीत मुदत कर्ज देण्याचं मान्य केलं आहे.

**ऊसगाळप**

राज्यात सध्या 97 सहकारी आणि 98 खासगी अशा 195 साखर कारखान्यांचे ऊस गाळप सुरू आहे. या कारखान्यांकडून दर दिवशी नऊ लाख 75 हजार 50 मेट्रिक टन क्षमतेने ऊस गाळप सुरू आहे. आतापर्यंत 461 लाख 57 हजार मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण झालं असून 40 लाख 51 हजार मेट्रिक टन साखर उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्तालयानं दिली आहे.

**पर्पलजल्लोष**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग फाउंडेशननं आयोजित केलेल्या पर्पल जल्लोष कार्यक्रमाची सुरुवात, भारतीय संविधानाचा जल्लोष करत, दिव्यांग जल्लोष दिंडीने करण्यात आली. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा, दिव्यांग अधिकार कायदा आणि शिक्षण कायदा प्रत पालखीमध्ये ठेवून त्याची दिंडी काढण्यात आली. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या दिंडीला सुरुवात झाली.

**आंतरराष्ट्रीयबहुविषयकपरिषद**

सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक समस्या या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय बहुविषयक परिषद येत्या रविवारी पुण्यात होणार आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालयातर्फे आयोजित ही परिषद कोथरूडच्या गांधी भवनात होईल. या परिषदेत नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका आणि भारतातील तरुण संशोधकांचे शंभरपेक्षा जास्त संशोधन निबंध सादर केले जातील.

**अपघात**

पुणे-नाशिक महामार्गावर आज सकाळी एका टेम्पोनं व्हॅनला दिलेल्या धडकेत नऊ जणांचा मृत्यू झाला; तर तीनजण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये 4 महिला 4 पुरुष आणि एका लहान बाळाचा समावेश आहे. मिनीव्हॅन नारायणगावच्या दिशेने जात असताना पाठीमागून टेम्पोनं धडक दिल्याने ती रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिकाम्या बसवर आदळली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून अपघातातल्या मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**कुस्ती**

अहिल्यानगर इथं  होणाऱ्या ६७व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची पुणे जिल्हा निवड चाचणी आज आणि उद्या होणार आहे, अशी माहिती पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके यांनी दिली. या निवड चाचणी स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ४५०हून अधिक कुस्तीगीरांमध्ये लढत रंगणार आहे.

**दौड**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अमृत महोत्सवी संविधान सन्मान दौडचे आयोजन येत्या २५ जानेवारी रोजी पुण्यात केलं जाणार आहे. या स्पर्धेत विविध अंतरासाठी, विविध वयोगटातील सुमारे १० हजार नागरिक धावतील अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 30 तर किमान १५ पूर्णांक ५  दशांश अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल आणि दुपारनंतर ढगाळ हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**